N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड  **P.S.(ठाणे):** अंबाजोगाई शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0248  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/06/2023 23:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 26/06/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/06/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:08 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/06/2023  **Time (वेळ):** 22:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 036

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/06/2023 22:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अंबाजोगाई,अंबाजोगाई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बिभिषन श्रीरंग शेळके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हातोला ,अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हातोला ,अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7038598308

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुबारक बशीर शेख | | | 1. पार्ट ऑफ 58, पचपीर नगर, लातुर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एक हजार रुपये | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि.कार्यालय, बीड.
दिनांक 26/06/2023
मी बिभीषन श्रीरंगराव शेळके, वय 49 वर्ष, व्यवसाय शेती, रा.हातोला, ता.अंबाजोगाई जि.बीड मो.नं. 7038598308, 9049718508
मी आज दिनांक 26/06/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांचे समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकणचा रहिवाशी असुन शेती करतो. मी दिनांक 23/06/2023 रोजी हॉटेल शेतकरी समोर मोरेवाडी शिवार अंबजोगाई येथे श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, यांचे समक्ष तक्रार दिली की, "मौजे बर्दापुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथे शेत गट क्रमांक 530, 532 व 533 मध्ये माझे व चुलते श्री.नामदेव बाबुराव शेळके रा.हातोला यांची शेतजमीन असुन सदर शेताची भुमी अभीलेख कार्यालय, अंबाजोगाई यांनी मोजणी करुन हद्द निश्चीत केली आहे. मोजणी करुन हद्द निश्चीत केलेल्या कागदपत्रांचे संचाचे नकला मिळण्यासाठी भुमी अभिलेख कार्यायल, अंबाजोगाई येथे अर्ज केला असुन श्री.शेख, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई हे मोजणी करुन हद्द कायम केले बाबतचे कागदपत्रांचा संपुर्ण संचाचे नकला (पंचनामा, नोटीस, नकाशे. वैगरे) देण्यासाठी शासकीय फिस (चलन) व्यतिरीक्त 1000/- रुपयाची मागणी करीत आहेत " वगैरे मजकुराची तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 23/06/2023 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. बीड यांनी श्री.शेख हे माझ्याकडे माझे कामासंदर्भाने लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन मला व पंच क्रमांक 1 श्री.इनामदार यांना श्री.शेख यांचेकडे भूमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखवले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्रमांक 1 श्री.इनामदार यांना श्री.शेख यांचेकडे भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई येथे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व लोकसेवक श्री.शेख यांची भूमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई येथे भेट झाली. भेटी दरम्यान माझी श्री.शेख साहेबांशी माझ्या कामा संदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान मी, श्री.शेख यांचेकडे ऑनलाईन भरलेले चलनाची पावती दिली. त्यावेळी श्री.शेख यांनी कार्यालयातील श्री.गिते यांना माझे नकला बाबत विचारणा करुन शेत गट क्रमांक 530 व 532 च्या नकलाचा संच माझ्याकडे देऊन द्या ना असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना किती देऊ असे म्हणालो असता, त्यांनी काय द्यायचे ते द्या असे म्हणुन उजवे हाताने पाच बोटे दोन वेळा दाखवुन इशाऱ्याने पैशाची मागणी केली त्यावेळी मी त्यांना पन्नास, पाचशे, पाचशे घेऊन येतो असे म्हणुन मी व पंच क्रमांक 1 सुरक्षीत ठिकाणी परत आलोत. त्यानंतर आपण मला व पंच क्रमांक 1 यांना स्वतंत्र विचारपुस केली तसेच व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री.शेख यांनी माझ्याकडे निश्चीत किती रक्कम मागीतली याबाबत स्पष्ट झाले नाही त्यामुळे मला व पंच क्रमांक 1 श्री.इनामदार यांना पुन्हा श्री.शेख यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले.
त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्रमांक 1 श्री.इनामदार यांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन मला व पंच क्रमांक 1 श्री.इनामदार यांना श्री.शेख यांचेकडे भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई येथे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व लोकसेवक श्री.शेख यांची भूमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई येथे भेट झाली. त्यानंतर मी, पंच क्र.1 व श्री.शेख असे कार्यालयासमोरील चहाचे हॉटेलवर गेलो त्याठिकाणी माझी व श्री.शेख यांची कामा संदर्भाने चर्चा झाली. मी श्री.शेख यांना शेत गट क्रमांक 533 च्या मोजणीचे नकलाची मागणी केली. त्यावेळी श्री.शेख यांनी गिते यांना देऊन टाक असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्री.शेख यांनी " द्या ना, हजार पाचशे.. हजारीक द्या ना, हजार " असे म्हणुन माझ्याकडे शेत गट क्रमांक 530, 532 व 533 चे मोजणी करुन हद्द कायम केले बाबतचे कागदपत्रांचा संपुर्ण संचाचे नकला देण्यासाठी शासकीय

फिस (चलन) व्यतिरीक्त 1000/-रु. लाचेची मागणी करुन सोमवार दिनांक 26/06/2023 रोजी स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन दिनांक 26/06/2023 रोजी श्री.शेख यांचे विरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्याबाबत दिनांक 23/06/2023 रोजी सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा केला आहे.

त्यावरुन आज दिनांक 26/06/2023 रोजी पाण्याचे टाकीजवळ, सरकारी दवाखाना, अंबाजोगाई येथे शासकीय वाहनात दोन शासकीय पंचांसमक्ष श्री.शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 02 नोटा असे एकुण 1000/-रु. लाच रकमेस अँथ्रासिन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवुन लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला.

सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास श्री.शंकर शिंदे यांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 श्री.इनामदार यांना श्री.शेख यांना लाच रक्कम देण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 श्री.नेवारे शासकीय वाहनाने येत होते. मी व पंच क्र.1 श्री.इनामदार असे भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई येथे गेलो. त्याठिकाणी माझी, श्री.शेख साहेबांशी भेट झाली. भेटी दरम्यान माझी व श्री.शेख यांची कामा संदर्भाने चर्चा झाली. श्री.शेख साहेब यांनी शेत गट क्रमांक 533 चे मोजणी करुन हद्द कायम केले बाबतचे कागदपत्रांचा संपुर्ण संचाचे नकला मला दिल्या त्यानंतर श्री.शेख यांनी मला इशाऱ्याने पैशाची मागणी केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 1000/- रुपये काढुन श्री. शेख यांचे समोर धरले असता श्री. शेख यांनी सदर लाच रक्कम 1000/- रुपये डावे हाताने स्विकारुन डाव्या हाताने अंगावरील पॅन्टचे समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी आपण मला लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा 13.08 वा. केला.

इशारा प्राप्त होताच श्री.शंकर शिंदे हे पंच क्र.2 श्री.नेवारे व त्यांचे स्टाफसह आमचे जवळ आले. पोशि/राठोड यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. तेव्हा श्री.शंकर शिंदे यांनी श्री.शेख यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी पंच क्र.1 श्री.इनामदार यांना पंच क्र.2 श्री. नेवारे यांचे समक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.इनामदार यांनी सांगितले की, " श्री.शेख यांनी तक्रारदार यांचेकडे इशाऱ्याने पैशाची मागणी करुन स्वत: लाच रक्कम स्विकारुन त्यांचे अंगावरील पँटचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली आहे." असा खुलासा पंच क्र.1 श्री.इनामदार यांनी केला. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.शेख यांना लाच रकमेबाबत विचारले असता सदरची लाच रक्कम ही त्यांचे अंगावरील पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सं◌ागितले. त्यावर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.शेख यांचेकडील लाच रक्कम 1000/- रु. पंच क्र. 2 श्री. नेवारे यांना ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगितले. त्यावर पंच क्र. 2 श्री.नेवारे यांनी श्री.शेख यांचे पँटचे समोरील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 1000/-रु. काढुन नोटांचे खात्री केली असता सदर नोटांचे क्रमांक व वर्णन हे सापळा पुर्व कारवाई मधील नमुद नोटांचे क्रमांक व वर्णन हे तंतोतंत मिळुन येत असल्याचे सांगितले. त्यानतंर श्री.शंकर शिंदे यांनी श्री.शेख यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता, त्यांनी त्यांचे नाव मुबारक बशीर शेख, वय-57 वर्ष, व्यवसाय नौकरी, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई जि.बीड रा.नालंदा बौध्द विहार जवळ प्रकाशनगर लातुर ह.मु.पार्ट ऑफ 58, पचपीर नगर, लातुर ता.जि.लातुर (वर्ग-3) असे सांगितले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन श्री.शेख यांना ताब्यात घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे आलो. त्याबाबत दिनांक 26/06/2023 रोजी यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला आहे.

तरी दिनांक 23/06/2023 रोजी श्री.शेख, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई यांनी माझ्याकडे माझे मौजे बर्दापुर शेत गट क्रमांक 530, 532, 533 मधील शेताची मोजणी करुन हद्द कायम केले बाबतचे कागदपत्रांचा संपुर्ण संचाचे नकला देण्यासाठी शासकीय फिस (चलन) व्यतिरीक्त 1000/-रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन आज दिनांक 26/06/2023 रोजी 13.08 वा. उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अंबजोगाई येथे लाच रक्कम 1000/-रु. पंचामसक्ष स्विकारली असता, श्री.शेख यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. लाच रक्कम 1000/- रुपये श्री.शेख यांच्याकडुन जप्त करण्यात आलेली आहे. म्हणुन माझी मुबारक बशीर शेख, वय-57 वर्ष, व्यवसाय नौकरी, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, अंबाजोगाई जि.बीड रा.नालंदा बौध्द विहार जवळ प्रकाशनगर लातुर ह.मु.पार्ट ऑफ 58, पचपीर नगर, लातुर ता.जि.लातुर (वर्ग-3) यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी प्रिन्ट काढल्या नंतर वाचुन पाहिली, ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

( शंकर शिंदे )
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vinod Uttam Gholve(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलिस ठाणे अमलदार
पो स्टे. अंबाजोगाई शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vinod Uttam Gholve
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

HC /1151 ...